# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक 10/06/2015 (का.प.क्र.01) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती विशेष सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक १० जुन २०१५ रोजी (का.प.क्र.०१) मा. पिठासीन अधिकारी श्री.विरेंद्र सिंग. भा.प्र.से., जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची विशेष सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी १०.०० वा. वंदेमातरम् या गीताने सूरू झाली. सभेला अतिरीक्त आयुक्त श्री.रमेश पवार,नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांच्यासह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स्थायी समितीचे स. सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | स.सदस्यांचे नांव |
|---|---|
| १ | श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| २ | श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| ३ | श्री.कमलाकर शामराव जगताप |
| ४ | श्री.गजानन भानुदास मनगटे |
| ५ | श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ६ | श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ७ | श्री.दिलीप गंगाधर थोरात |
| ८ | श्रीमती कमल रामचंद्र नरोटे |
| ९ | श्री.चित्ते नितीन रमन |
| १० | श्री.एडके विकास प्रकाश |
| ११ | श्री.खान इरशाद इब्राहीम |
| १२ | श्रीमती शेख समीना इलियास |
| १३ | श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| १४ | श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| १५ | श्रीमती रेश्मा अशपाक कूरैशी |

**विषय क्रमांक १ :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१(१) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती, आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० अन्वये स्थायी समिती सभापती पदावर निवड करणे.

नगर सचिव :मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० चे नियम २(२) चे तरतूदीप्रमाणे मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांचेशी विचार विनिमय

केल्यानंतर स्थायी समितीचे सभापती पदाची निवडणूक घेण्यासाठी स्थायी समिती विशेष सभेची दिनांक १०/०६/२०१५ वेळ सकाळी १०.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

नियम क्र.४ अन्वये या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त किंवा त्यांचा प्रतिनिधी असेल, जो अतिरिक्त आयुक्तांच्या कमी दर्जाचा नसावा, अशी तरतूद आहे.त्यानुसार मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांनी त्यांचे आदेश जा.क्र.२०१५/नपाप्र/आस्था-२/डीजेएमएस क्र., दिनांक ०५.०६.२०१५ अन्वये स्थायी समितीच्या विशेष सभेचे पीठासीन अधिकारी म्हणून काम करण्यास मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना प्राधिकृत केले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१(१) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती, आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० अन्वये स्थायी समिती सभापती पदासाठी निवड करण्याकरीता दिनांक ०५/०६/२०१५ रोजी स्थायी समिती विशेष बैठकीची सूचना निर्गमित करण्यात आली आहे. तसेच निवडणूक घेणे संदर्भात परिपत्रक क्रमांक मनपा/नस/२०१५/२३०, दिनांक ०५.०६.२०१५ निर्गमित करण्यात आले आहे व त्यासोबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती, आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० अन्वये ची प्रत तसेच सर्व समित्यांचे सदस्यांची यादी देखिल उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक ०८/०६/२०१५ ते ०९.०६.२०१५ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व दिनांक ०९.०६.२०१५ रोजी नामनिर्देशनपत्र स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक ०९/०६/२०१५ रोजी दिलेल्या वेळेत म्हणजेच दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्थायी समिती सभापती पदासाठी खालीलप्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

१. श्री.थोरात दिलीप गंगाधर
२. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. श्री.खान इरशाद इब्राहीम

*(नगर सचिव हे स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र छाननीसाठी पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करतात.)

पिठासीन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० अन्वये चे नियम क्र.५(२) अन्वये सभापती स्थायी समिती पदासाठी आता प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली. नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचे काम पूर्ण झाले असून खालीलप्रमाणे नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहे.

१. श्री.थोरात दिलीप गंगाधर
२. श्री.खान इरशाद इब्राहीम

श्री.खान इरशाद इब्राहीम:माझा आक्षेप आहे. तो मी आपणाकडे देत आहे.

यावेळी आक्षेप बाबतचा अर्ज मा.पीठासीन अधिकारी यांचेकडे सादर करतात.

मा.पीठासीन अधिकारी :आपण जो आक्षेप घेतला त्यानुसार कोणत्याही उमेदवारास नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची मुभा आहे. त्याचे सुचक व अनुमोदक कुणीही असु शकतात. फक्त ते त्या समितीचे सदस्य असले पाहिजे. एक उमेदवारास सुचक व अनुमोदक हे कॉमन असेल तर जे प्रथम नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असेल ते ग्राह्य धरले जाते. त्यामुळे आपला आक्षेप फेटाळण्यात येत आहे. प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र वैध आहे.

श्री.खान इरशाद इब्राहीम:ज्यांचे नामनिर्देशन पत्र आहेत. त्यावर सुचक व अनुमोदक कोण आहेत.

पीठासीन अधिकारी :श्री.थोरात दिलीप गंगाधर यांचे दोन नामनिर्देशन पत्र प्राप्त आहेत.अ.क्र. १ च्या नामनिर्देशन पत्रावर श्री.चित्ते नितीन रमन व श्री. गजानन रामकिशन बारवाल हे अनुक्रमे सुचक व अनुमोदक आहेत. अ.क्र.२ वर श्रीमती कमल रामचंद्र नरोटे व श्री.कमलाकर शामराव जगताप हे अनुक्रमे सुचक व अनुमोदक आहेत. तसेच श्री.खान इरशाद इब्राहीम यांच्या नामनिर्देशन पत्रावर श्री.एडके विकास प्रकाश व श्रीमती शेख समीना शेख इलियास हे अनुक्रमे सुचक व अनुमोदक आहेत.

पिठासीन अधिकारी :आता १५ मिनिटांच्या आत उमेदवाराने सही केलेली लेखी सूचना पीठासीन अधिकारी यांना देवून त्यांना आपली उमेदवारी मागे घेता येईल. आता सभागृहातील घड्याळाप्रमाणे १०.१२ वाजले असून १०.२७ वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. तसेच नियम क्र.५(४) अन्वये उमेदवारी मागे घेण्याची नोटीस दिल्यानंतर ती नोटीस रद्द करता येणार नाही.

निवडणुक प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत कृपया कोणत्याही स.सदस्यांनी सभागृह सोडू नये.

पीठासीन अधिकारी : आता सभागृहातील घड्याळाप्रमाणे १०.२७ वाजले असून स्थायी समिती सभापती पदासाठी दोन उमेदवारापैकी विहित मुदतीत उमेदवारांनी स्वतःची सही करून पिठासीन अधिकारी यांना लेखी सूचना देवून आपले नामनिर्देशन/उमेदवारी अर्ज परत घेतले नाहीत.

स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती, आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० अन्वयेचे नियम क्र.६(२) नुसार प्राप्त नामनिर्देशनावरील नावांच्या मराठी वर्णानुक्रमाने लावण्यात आली असून ती खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र. उमेदवाराचे नांव
०१. श्री.खान इरशाद इब्राहीम
०२. श्री.थोरात दिलीप गंगाधर

पीठासीन अधिकारी :मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती पदाच्या निवडणूका घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० अन्वये चे नियम क्र.६(३) प्रमाणे हात वर करून मतांची नोंद घेण्यात येईल. नगर सचिव यांनी मतदान प्रक्रीया संबंधीची माहिती सभागृहास द्यावी.

नगर सचिव :मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० चे तरतुदी अन्वये

सभापती, पदाच्या मतदान प्रक्रीया व निवडी संबंधी तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

०१.नियम ६(१) अन्वये एकच वैध नामनिर्देशन करण्यात आले असेल तर पिठासीन अधिकारी अशा उमेदवाराची रितसर निवड झाल्याचे घोषित करेल.

०२.नियम ६(२) अन्वये जर वैध नामनिर्देशित उमेदवारांची संख्या एकापेक्षा अधिक असेल, तर पीठासीन अधिकारी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे मराठी वर्णानुक्रमे लावतील.

०३.नियम क्र.६(३) अन्वये उमेदवारांचे नांव वर्णानुक्रमाने पुकारण्यात येईल.ज्यांचे नांव पुकारण्यात येईल,त्यांचेसाठी प्रथम हात वर करून मतदान घेण्यात येईल व त्यांना मिळालेल्या मतांची नोंद घेण्यात येईल व त्यांनी ज्या उमेदवाराच्या बाजुने मत दिले आहे, अशा स्थायी समिती सदस्यांचे नांवाची नोंद कार्यवृत्तांतात नोंदविण्यात येईल.

०४.नियम क्र.६(४) (एक) अन्वये मत देण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक सदस्यास आपले मत देण्यासाठी रास्त व वाजवी संधी मा.पिठासीन अधिकारी देतील.

०५.नियम क्र.६(४) (दोन) अन्वये ज्यांचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे, अशा सदस्यास पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.

०६.नियम क्र.६(५) अन्वये ज्या सदस्यांनी मतदान केलेले नाही, त्यांची नोंद देखिल कार्यवृत्तांतात घेण्यात येईल.

०७.नियम ६(७) अन्वये निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या पीठासीन अधिकारी घोषित करतील व ज्या उमेदवाराला मतदानात जास्त मते पडतील, तो उमेदवार रितसर निवडूण आल्याचे पीठासीन अधिकारी घोषित करतील.

०८.नियम क्र. ६(८) अन्वये मते समसमान मिळाल्यास पीठासीन अधिकारी असे घोषित करील की, निवडणुकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून सोडतीद्वारे ठरविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले स्थायी समिती सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठी काढण्यात येईल.

०९.नियम क्र. ६(९) अन्वये ज्या उमेदवाराच्या नांवाची चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रीतीने निवडून आला असल्याचे पिठासीन अधिकारी घोषित करतील.

पीठासीन अधिकारी :आता मराठी वर्णानुक्रमाने उमेदवारांचे नांव घोषित करण्यात येत आहेत.

श्री.खान इरशाद इब्राहीम यांना सभापती,स्थायी समिती पदासाठी ज्यांना मते द्यावयाची आहेत, त्यांनी आपले हात वर करून मत नोंदवावे मतगणना अधिकारी यांनी कृपया ज्यांनी ज्यांनी श्री.खान इरशाद इब्राहीम यांना हात वर करून मतदान करित आहे, त्यांची नांवे लिहून घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझेकडे सादर करावी. तसेच मतदान नोंदवितांना मतगणना अधिकारी यांनी मतदारांचे व्हिडीओ चित्रीकरण होईल,याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | हात वर करून मतदान करणाऱ्या स.सदस्यांची नांवे |
|---|---|

| | |
|---|---|
| १. | श्री.खान इरशाद इब्राहीम |
| २. | श्रीमती शेख समिना इलियास |
| ३. | श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ४. | श्री.एडके विकास प्रकाश |

पीठासीन अधिकारी :२) श्री.थोरात दिलीप गंगाधर यांना सभापती,स्थायी समिती पदासाठी ज्यांना मते द्यावयाची आहेत, त्यांनी आपले हात वर करून मत नोंदवावे मतगणना अधिकारी यांनी कृपया ज्यांनी ज्यांनी श्री.थोरात दिलीप गंगाधर यांना हात वर करून मतदान करित आहे, त्यांची नांवे लिहून घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझेकडे सादर करावी. तसेच मतदान नोंदवितांना मतगणना अधिकारी यांनी मतदारांचे व्हिडीओ चित्रीकरण होईल,याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | हात वर करून मतदान करणाऱ्या स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| १. | श्री.दिलीप गंगाधर थोरात |
| २. | श्री.गजानन रामकिशन बारवाल |
| ३. | श्री.चित्ते नितीन रमन |
| ४. | श्रीमती कमल रामचंद्र नरोटे |
| ५. | श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| ६. | श्री.गजानन भानुदास मनगटे |
| ७. | श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ८. | श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ९. | श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १०. | श्री. कमलाकर शामराव जगताप |

श्रीमती रेश्मा अशपाक कुरेशी यांनी मतदानात भाग घेतलेला नाही.

स्थायी समितीचे एकुण सदस्य संख्या - १६

विशेष सभेस एकूण हजर असलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या - १५

मतदानात भाग घेतलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या - १४

मतदानात भाग न घेतलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या - ०१

<u>उमेदवारांना मिळालेली मते :</u>

०१. श्री.खान इरशाद इब्राहीम - (०४)

०२. श्री.थोरात दिलीप गंगाधर - (१०)

वरीलप्रमाणे झालेल्या मतदानात स्थायी समिती सभापती पदासाठी श्री.थोरात दिलीप गंगाधर यांना सर्वात जास्त मते मिळालेली आहेत.त्यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१(१) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० अन्वये वैध रितीने निवड झाल्याचे याद्वारे

घोषित करण्यात येते.

**<u>ठराव :-</u>**

सभागृहात झालेल्या मतदानानुसार स्थायी समिती सभापती पदासाठी श्री.थोरात दिलीप गंगाधर यांना सर्वात जास्त मते मिळालेली आहेत. त्यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० अन्वये श्री.थोरात दिलीप गंगाधर यांची स्थायी समिती सभापती पदावर बहुमताने झालेल्या निवडीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे पीठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

(महबुबखॉ पठाण)
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद